IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# सामाजिक परिवर्तनात महिलांची भूमिका

**प्रा. लगड सुरेखा रामदास**
इतिहास विभाग प्रमुख
रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर. ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर.

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***
*सामाजिक परिवर्तन*
*महिलांची भूमिका*
*स्त्रीजागृती*

**ABSTRACT**
समाजाच्या प्रगतीचा पाया हा समानतेच्या मूल्यांवर आधारित असतो. भारतीय समाजात स्त्रियांना दीर्घकाळ सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विषमतेचा सामना करावा लागला. परंतु, शिक्षण, सामाजिक सुधारणा आणि स्त्रीजागृती चळवळींमुळे महिलांनी आपले स्थान पुन्हा प्रस्थापित केले. प्रस्तुत लेखात सामाजिक परिवर्तन प्रक्रियेत महिलांची भूमिका, त्यांचे योगदान, तसेच आजच्या बदलत्या सामाजिक संदर्भात महिलांचे नेतृत्व यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 4%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Lagad, S. R. (2025). *सामाजिक परिवर्तनात महिलांची भूमिका.* IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), **790–795.**

**प्रस्तावना :-**

सामाजिक परिवर्तन म्हणजे मूल्ये, परंपरा, जीवनपद्धती आणि सामाजिक संरचनेत होणारे व्यापक आणि दीर्घकालीन बदल. प्रसिद्ध विचारवंत हेरी जॉन्सन यांच्या मते, 'समाजाच्या संरचनेमध्ये कोणत्याही कारणामुळे कोणताही बदल झाला तर अशा बदलांना सामाजिक परिवर्तन म्हणून ओळखले जाते.' भारतीय समाजात महिलांचे स्थान प्राचीन काळापासून परिवर्तनाच्या प्रक्रियेत आहे. एके काळी स्त्रियांना फक्त घरगुती चौकटीत मर्यादित ठेवण्यात आले होते. चूल आणि मुल हेच तिचे अस्तित्व होते. परंतु नंतर मात्र हळूहळू परिस्थितीत बदल होत गेले. स्त्रिया या समाजाचे अर्धेबल आहेत. आणि त्यांच्या सक्रिय सहभागा शिवाय सामाजिक प्रगती अपूर्ण राहते. हे लक्षात आल्यानंतर त्यांच्या परिवर्तनाला सुरुवात झाली. आणि मग भारतीय समाजात स्त्री नेहमीच परिवर्तनाची वाहक राहिली आहे. मग ती संत साहित्याच्या माध्यमातून असो, वा शिक्षण प्रसारातून असो किंवा स्वातंत्र्याच्या चळवळीतून भारतीय समाजाच्या संदर्भात महिलांची भूमिका ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाची असून त्यांच्या प्रगतीमुळे समाजाची प्रगती झालेली दिसते. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात देखील महिलांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या. आणि प्रादेशिक आणि राष्ट्रीय पातळीवर त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले. सरोजिनी नायडू, विजयालक्ष्मी पंडित, कमलादेवी चट्टोपाध्याय आणि मृदुला साराभाई यासारख्या महिला नेत्या प्रमुख व्यक्तिमत्त्व म्हणून उदयास आल्या. केरळमध्ये ॲनी मस्करेन आणि ए. व्ही. कुट्टीमालु अम्मा, मद्रास प्रेसिडेन्सी मध्ये दुर्गाबाई देशमुख आणि उत्तर प्रदेशमध्ये रामेश्वरी नेहरू यासारख्या प्रांतीय नेत्यांनी देखील प्रभावी भूमिका बजावल्या.

या व्यतिरिक्त, ॲनी बेझंट आणि मागरिट कझिन्स सारख्या आयरिश महिलांनी ब्रिटिश शोषणाच्या अनुभवांचे योगदान दिले, ज्यामुळे साम्राज्यवादाच्या विरोधात चळवळीचे प्रयत्न अधिक समृद्ध झाले. या महिलांनी एकत्रितपणे राष्ट्रवादी संघर्ष आणि भारताच्या स्वातंत्र्याच्या मार्गाला आकार दिला. अशा प्रकारे भारतीय इतिहास महिलांच्या कामगिरीनी भरलेला आहे. भारतीय समाजात प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतच्या महिलांचे योगदान आहे. गार्गी, मैत्रेयी, सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, कस्तुरबा गांधी, इंदिरा गांधी अशा अनेक महिलांनी सामाजिक परिवर्तनाचे नेतृत्व केले.

भारतीय संस्कृतीत महिलांना आदिम काळापासून प्रतिष्ठा मिळाली आहे. गार्गी आणि मैत्रेयी, सातवाहन काळातील राणी नागनिका, गौतमी बलश्री तर मध्ययुगीन कालीन रजिया सुलतान, काकतीय साम्राज्यातील रुद्रमादेवी.तसेच मराठा साम्राज्यातील राजमाता जिजाऊ, महाराणी ताराराणी, अहिल्याबाई होळकर, तर अर्वाचीन काळातील आनंदीबाई गोपाळराव जोशी या पहिल्या भारतीय महिला डॉक्टर होत्या. तसेच झाशीची राणी लक्ष्मीबाई पासून ते भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या पर्यंत, महिलांनी मोठ्या प्रमाणात सामाजिक बदलाची महत्त्वपूर्ण उदाहरणे मांडली आहेत. राजाराम मोहन रॉय, ज्योतिबा फुले, सावित्री फुले, रमाबाई रानडे, पं. नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्वांनी स्त्री शिक्षण व समानतेसाठी केलेले प्रयत्न सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील निर्णायक टप्पे ठरले. स्त्री-शिक्षणाकडे फुले ह्यांनी सामाजिक परिवर्तनाचे हत्यार म्हणून पाहिले. आपापले कुटुंब सावरण्यासाठी स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे असे म्हणण्याऐवजी स्त्रियांमध्ये मूलभूत चिकित्सक प्रश्न विचारण्याची ताकद निर्माण व्हावी असाच त्यांचा प्रयत्न होता. अमर्त्य सेन यांच्या मते, 'स्त्री जेव्हा शिक्षण, आरोग्य, प्रजनन, आर्थिक आणि सार्वजनिक निर्णय प्रक्रियेत सक्रिय होते, तेव्हा समाजात व्यापक परिवर्तन घडते.' अलीकडच्या काळात आपण अनेक महिलांना भारतातील उच्च पदावर विराजमान होताना आणि मोठं मोठ्या संस्थांचे व्यवस्थापन करताना पाहिले आहे. उदा. एसबीआयच्या पहिल्या महिला अध्यक्षा अरुंधती भट्टाचार्य, ओएनजीसीच्या पहिल्या महिला अध्यक्षा डॉ. अलका मित्तल, स्टील अथॉरिटी ऑफ इंडिया (SAIL) च्या अध्यक्षा सोम मोंडल यांसारख्या इतर काही उल्लेखनीय महिला आहेत, की ज्यांनी विविध क्षेत्रात गगन भरारी घेतली आहे. ग्रामीण क्षेत्रातील सर्वात प्रसिद्ध महिला व्यवसाय यशोगाथेपैकी एक गाथा म्हणजे 'श्री महिला गृह उद्योग लिज्जत पापड'. १९५९ मध्ये मुंबईतील सात महिलांनी केवळ ८० रुपयांच्या भांडवलासह सुरू केलेल्या या कंपनीची २०१८ मध्ये वार्षिक उलाढाल ८०० कोटी रुपयांपेक्षा जास्त होती. ही कंपनी देशभरातील ४३,००० (२०१८ मध्ये) महिलांना रोजगार प्रदान करते. अलीकडील काळात मुलींना शिक्षण मिळू लागल्याने, आरोग्यविषयक जागरूकता वाढल्याने, तसेच महिलांच्या राजकीय आणि सामाजिक सहभागामुळे सामाजिक परिवर्तनाचा वेग वाढू लागला आहे. स्त्रियांच्या सक्षमीकरणाचा पाया म्हणजे शिक्षण. शिक्षणामुळे मुलींची विचारशक्ती, आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि सामाजिक सहभाग यांत लक्षणीय बदल घडतो.

शिक्षणामुळे मुली दडपशाहीला विरोध करतात, विषमता ओळखतात आणि स्वतःच्या हक्कांची जाणीव ठेवतात.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. महिलांची सामाजिक परिवर्तनातील भूमिका अभ्यासणे.
2. शिक्षण, आरोग्य, कुटुंब नियोजन, अर्थव्यवस्था राजकारण आणि सार्वजनिक सहभाग यांच्यात महिलांचे योगदान विशद कारणे.
3. स्त्री सक्षमीकरणामुळे समाजातील बदल ओळखणे.
4. सामाजिक माध्यमांमधील महिला नेतृत्वाच्या प्रभावाचे विश्लेषण करणे.
5. भविष्यात महिलांच्या सामाजिक सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी उपाय सुचवणे.

**संशोधनाची गृहीतके (Hypotheses)**

1. शिक्षणामुळे महिलांच्या सामाजिक सहभागात वाढ झाली आहे.
2. सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत महिला ही केवळ सहभागी नसून दिशा ठरवणारी शक्ती आहे.
3. महिलांचे आर्थिक स्वावलंबन हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे.
4. समाजातील स्त्रीविषयक दृष्टिकोनात बदल झाल्यामुळे स्त्री-पुरुष समानतेचे वातावरण निर्माण होत आहे.
5. शिक्षणामुळे महिलांच्या विचारसरणी मध्ये व्यापक परिवर्तन घडले आहे.

**संशोधनपद्धती (Methodology)**

या संशोधनासाठी गुणात्मक (Qualitative) पद्धत वापरली आहे. संबंधित पुस्तके, संशोधन निबंध, वृत्तपत्रलेख, सरकारी अहवाल, आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या अनुभवांवर आधारित दुय्यम (Secondary) माहितीचा उपयोग केला आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी**

भारतीय संस्कृतीत स्त्रीला देवीच्या रूपात पूजले गेले, 'यंत्र नार्यस्तू पूज्यते रमन्ते तत्र देवता' या प्राचीन साहित्यातील श्लोकात तिचे महत्व अधोरेखित केले आहे. परंतु वास्तवात तिला दुय्यम स्थान देण्यात आले. मध्ययुगातील पडदा प्रथा, बालविवाह, सती प्रथा यामुळे स्त्रिया सामाजिक जीवनापासून दूर राहिल्या. १९ व्या शतकात सामाजिक सुधारणा चळवळींनी या प्रथांना आव्हान दिले. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा दीप प्रज्वलित केला, तर रमाबाई रानडे यांनी विधवा शिक्षणाची वाट दाखवली. या चळवळींनी स्त्रीच्या सामाजिक स्थानात मूलभूत बदल घडवून आणले. भारताच्या स्वातंत्र्याच्या संग्रामात विशेषतः म. गांधी युगात महिलांनी सक्रिय सहभाग नोंदवला. कस्तुरबा गांधी, सरोजिनी नायडू, सुचेता कृपलानी, अरुणा आसफ अली यांसारख्या महिलांनी नेतृत्वाची भूमिका बजावली. त्यांच्या सहभागामुळे समाजात महिलांच्या राजकीय जाणिवा वाढल्या. स्वातंत्र्यानंतर संविधानाने महिलांना समानतेचा अधिकार दिला, ज्यामुळे सामाजिक परिवर्तनाची नवी दिशा मिळाली. त्यामुळे समाजाच्या विकासामध्ये आणि प्रगतीमध्ये महिलांचा सहभाग वाढला आहे.

भारत हा परंपरा आणि सांस्कृतिक मूल्यांनी समृद्ध असा देश आहे. जिथे महिलांना समाजात एक प्रमुख स्थान आहे. आज महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. महिलांकडे अनेक कल्पना आणि दृष्टीकोन असतात. त्यामुळे त्या अनेक घटकांमध्ये बदल घडून आणत आहेत. महिलांनी २१व्या शतकात ज्ञान आणि कौशल्याच्या आधारे सर्वच क्षेत्र काबीज केली आहेत. शिक्षणला समाज परिवर्तनाचे साधन म्हटले जाते. शिक्षणामुळे समाजात मोठ्या प्रमाणात बदल घडून येतात. आज ग्रामीण आणि शहरी भागात शिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढला आहे. शिक्षित स्त्री ही केवळ कुटुंबाचाच नव्हे तर समाजाच्या विकासाचाही केंद्रबिंदू ठरते. शासकीय योजनांमधून (उदा. बेटी बचाओ-बेटी पढाओ, महिला आर्थिक विकास महामंडळ, स्वयं-सहायता गट) महिलांच्या शिक्षण व आर्थिक स्वावलंबनात लक्षणीय वाढ झाली आहे. महिला बचत गटातून महिला स्वत:चा व कुटुंबाच्या आर्थिक बाजू विकसित करतात. बचत गटांच्या (SHGS) माध्यमातून, महिला केवळ स्वतःला सक्षम बनवत नाहीत, तर आपल्या अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणातही योगदान देत आहेत. सरकारच्या सततच्या आर्थिक पाठिंब्यामुळे, स्वावलंबी भारताच्या ध्येयातही त्यांचा सहभाग दिवसेंदिवस वाढत आहे. गेल्या ६-७ वर्षात महिला बचत गटांच्या चळवळीला गती मिळाली

आहे. आज देशभरात ७० लाख बचत गट आहेत. आपल्याला महिलांची ताकद समजून घेण्याची गरज आहे, जी आपल्याला वैभवाच्या अधिक उंचीवर घेऊन जाईल.

**सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातील महिलांचे योगदान-**

आजच्या काळात महिला डॉक्टर, वकील, शास्त्रज्ञ, शिक्षक, समाजसेविका, पत्रकार, पोलिस अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. महिलांनी पारंपारिक चौकटी मोडून आर्थिक क्षेत्रातही नेतृत्व स्वीकारले आहे. स्वयं-सहायता गटांमुळे ग्रामीण महिलांनी उद्यमशीलतेची दिशा पकडली आहे. भारत हा कृषी प्रधान देश असल्याने देशातील ८०% महिलांना शेतीतून रोजगार मिळतो. इतिहासात महिलांचा कृषी व्यवसायातील सहभाग प्राचीन काळापासून महत्वाचा असून ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचे स्थान अतिशय महत्वाचे आहे. आजच्या घडीला बहुतेक महिला शेतीतील सर्व कामे पार पडतात. शेतीचा डोलारा स्त्रीयांच्या श्रम शक्तीवर तोलला जात आहे. मानवी इतिहासाचा मागोवा घेतला असता असे लक्षात येते की, अनेक शतकापासून स्त्रिया शेतीसाठी आपले योगदान देत आहेत. त्यामुळे शेतीचा विकास होताना दिसत आहे. तसेच महामानव बाबा आमटे यांच्या "लोकबिरादरी" प्रकल्पांत कार्यरत असलेल्या महिलांनी आदिवासी आणि वंचित समाजाच्या जीवनात परिवर्तन घडवून आणले आहे. १९७० नंतर स्त्रीवादी चळवळींनी समाजातील स्त्री-पुरुष संबंधांविषयी नवे प्रश्न उपस्थित केले. पितृसत्ताक व्यवस्थेला आव्हान देत महिलांनी स्वतःचा आवाज बुलंद केला. डॉ. आंबेडकरांच्या विचारसरणीने दलित व मागासवर्गीय महिलांना न्याय आणि सन्मानासाठी संघटित केले. या विचार प्रवाहांनी सामाजिक परिवर्तनाला वैचारिक दिशा दिली.

**आजच्या काळातील महिला आणि सामाजिक माध्यमे-**

डिजिटल युगात महिलांचा आवाज अधिक प्रभावी झाला आहे. समाज माध्यमांवर (Social Media) महिलांनी सामाजिक मुद्द्यांवर आवाज उठवला आहे -जसे की 'Me Too', 'Self Respect' Movement' इत्यादी. महिलांच्या नेतृत्वाखाली चालणाऱ्या स्वयंसेवी संस्था, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, आणि लैंगिक समानता यासाठी कार्य करतात.

**सामाजिक परिवर्तनात महिलांचे नेतृत्व-**

जगात सर्वाधिक महिला राजकारणी असलेल्या देशांपैकी भारतात एक आहे. महिलांनी राष्ट्रपती, पंतप्रधान, लोकसभा अध्यक्ष आणि विरोधी पक्षनेत्या यासह भारतातील उच्च पदांवर काम केले आहे. २०१८ पर्यंत, २९ पैकी १२ राज्ये आणि दिल्ली या केंद्रशासित प्रदेशात किमान एक महिला मुख्यमंत्री होती. सध्या भारतीय संसदेत ८१ महिला सदस्य आणि ४५८ पुरुष सदस्य आहेत जे अनुक्रमे १५.३% आणि ८४.९७% आहेत. महिलांचे नेतृत्व हे केवळ राजकीय नसून सामाजिक आणि नैतिक दिशादर्शक आहे. सामाजिक प्रबोधन, पर्यावरण संवर्धन, आरोग्य जनजागृती, बालहक्क चळवळी - या सर्वांमध्ये महिला पुढे आहेत. उदाहरणार्थ, मेधा पाटकर, इला भट्ट, सिंधुताई सपकाळ, पद्मा श्री सुलभा ब्रह्मे, सुधा मूर्ती यांनी आपल्या कार्यातून समाजात आदर्श परिवर्तन घडवले. तसेच खेळविश्वात पी.टी. उषा. हिमा दास, पी व्ही सिंधू, अंतराळ क्षेत्रातील कल्पना चावला. सुनिता विलियम्स, वैज्ञानिक क्षेत्रातील अन्ना मनी (Anna Mani) इंदिरा हिंदुजा अशा अनेक क्षेत्रात महिलांनी कौशल्य, धैर्य आणि संशोधनवृतीच्या जोरावर इतिहास घडविला आहे. तसेच कोविड-१९ दरम्यान, महिला डॉक्टर, परिचारिका, आशा कर्मचारी, अंगणवाडी सेविका आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालत रुग्णांची सेवा करत. कोविड -१९ विरुद्ध लसीकरण मोहीम यशस्वी करण्यात महिलांनी महत्वाची भूमिका बजावली. भारत बायोटेकच्या संयुक्त व्यवस्थापकीय संचालक एम डी सुचित्रा ईला यांना स्वदेशी कोविड-१९ लस, कोव्हॅक्सिन विकसित करण्यात त्यांच्या उत्कृष्ट भूमिकेसाठी पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. १२-१८ वयोगटातील लोकांसाठी कोविड-१९ लस विकसित करण्यात आली. त्या टीमचे नेतृत्व बायोलॉजिकल व्यवस्थापकीय संचालक महिमा दाटला यांनी केले. निःसंशयपणे, महिला आणि मुली समाजात सामाजिक, राजकीय आणि आर्थिक बदलाच्या अग्रदूत आहेत, भारतीय संविधानाने महिलांना समान हक्क आणि मतदानाचा अधिकार दिला. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३% आरक्षणामुळे महिलांनी नेतृत्वाची भूमिका घेतली.त्या मुळे गावच्या विकासात, स्वच्छता मोहिमेत शिक्षण प्रसारात आणि आरोग्य प्रकल्पात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. महात्मा फुले, डॉ. आंबेडकर आणि बाबा आमटे यांच्या कार्यातही महिलांचा सहभाग लक्षणीय होता. साधनाताई आमटे यांनी सामाजिक न्याय आणि पुनर्वसनासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

**व्यवसायीक क्षेत्रात महिलांची कामगिरी**

२००६ मध्ये, भारतातील पहिल्या बायोटेक कंपन्यांपैकी एक असलेल्या बायोकॉनची स्थापना करणाऱ्या किरण मजुमदार-शॉ यांना भारतातील सर्वात श्रीमंत महिला म्हणून घोषित करण्यात आले. २००६ मध्ये फोर्ब्सच्या जगातील सर्वात शक्तिशाली महिलांच्या यादीत स्थान मिळवणाऱ्या ललिता डी. गुप्ते आणि कल्पना मोरपारिया या भारतातील एकमेव व्यावसायिक महिला होत्या. गुप्ते ऑक्टोबर २००६ पर्यंत भारतातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी बैंक आयसीआयसीआय बँक चालवत होत्या आणि मोरपारिया जेपी मॉर्गन इंडियाच्या सीईओ आहेत. आता महिलांनी पारंपारिक 'घर सांभाळणारी' ही प्रतिमा बदलून 'समान भागीदार' म्हणून समाजात स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. त्यांनी कलेत साहित्यात, चित्रपटात आणि माध्यमात आपल्या विचाराद्वारे समाजाला विचार करायला भाग पडले आहे.

आज जरी महिलांची प्रगती होताना दिसत असली तरी अजूनही काही महिला या पासून वंचित असल्याचे दिसून येते. महिलांच्या प्रगतीत अजूनही काही प्रश्न भेडसावत आहे. आज देखील काही महिलांना समाजात विविध प्रश्नाना तोंड द्यावे लागते. समाजात आजही स्त्रीभ्रूण हत्या, लैंगिक अत्याचार, वेतनातील विषमता आणि घरगुती हिंसा यांसारख्या समस्याना महिलांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे महिला सशक्तीकरणाच्या दिशेने प्रयत्न होणे गरजेचे आहे.

**शिफारशी (Recommendations)**

1. महिलांच्या शिक्षणासाठी व व्यावसायिक प्रशिक्षणासाठी अधिक निधी उपलब्ध करून देणे.
2. ग्रामीण महिलांच्या स्वयं-सहायता गटांना तांत्रिक प्रशिक्षण देणे.
3. समाज माध्यमांद्वारे महिला नेतृत्व व प्रेरक कार्यांचा प्रसार करणे.
4. महिलांसाठी कौशल्य विकास आणि रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम राबवावेत.
5. मुलींच्या शिक्षणासाठी कुटुंब पातळीवर सकारात्मक मानसिकता विकसित करणे.
6. महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी कडक कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी.
7. महिलांच्या आरोग्य , पोषण आणि मानसिक आरोग्यावर विशेष भर देणे.

शेवटी, असे म्हणता येईल की "स्त्रियांच्या विकासासाठी सध्या राजकीय इच्छाशक्तीची फार गरज आहे. स्त्रियांना दुय्यम दर्जा देणारी व त्यांच्या प्रश्नांना दुय्यम मानणारी असमानतेची परिस्थिती व सामाजिक संरचना बदलणे हीच स्त्रियांच्या विकासातील पहिली पायरी आहे. आता विकासाचे नवे पर्व सुरू झाले पाहिजे, ज्यात स्त्रियांची समाजातील महत्त्वाची भूमिका ओळखून त्यांच्या योग्यतेचे भान ठेवले जाईल. अशी आशा आहे."

**सारांश (Conclusion)**

मानवी समाजाच्या वाटचालीत स्त्रीचे योगदान हे महत्वाचे आहे, महिला म्हणजे केवळ समाजाचा अर्धा भाग नव्हे, तर समाज परिवर्तनाची प्रेरक शक्ती आहे. शिक्षण, स्वावलंबन आणि जागृती यामुळे महिलांनी समाजात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. सामाजिक परिवर्तनाचे मूळ हे स्त्री सक्षमीकरणात आहे. आजची महिला केवळ परिवर्तनाची साक्षीदार नसून त्या परिवर्तनाची निर्माती आहे. महिला म्हणजे समाजाचा आत्मा. समाजातील प्रत्येक परिवर्तनात तिचा मूक किंवा स्पष्ट सहभाग असतो. आजच्या युगात शिक्षण, रोजगार, आणि तंत्रज्ञान या तीन स्तंभांवर उभी असलेली महिला समाजाच्या सर्वांगीण विकासाची हमी देत आहे. तिच्या सक्षमीकरणा शिवाय कोणतेही सामाजिक परिवर्तन पूर्ण होऊ शकत नाही. आता समानतेच्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे - आता ती स्थायी करण्याची जबाबदारी संपूर्ण समाजाची आहे.

**संदर्भ ग्रंथसूची (Bibliography)**

1. जोशी, र. के. भारतीय समाजातील बदलत्या भूमिका. पुणे: प्रगती प्रकाशन, २००८
2. पाटील, एस.एम. सामाजिक कोल्हापूर: नवनाथ पब्लिकेशन,
3. फुले, महात्मा ज्योतिराव. गुलामगिरी. पुणे: सत्यशोधक समाज, १८७३
4. सावित्रीबाई फुले महिला संशोधन केंद्र, पुणे विद्यापीठ, महिला आणि समाज, २०१७

**5.** “Women Empowerment in Modern India,” Economic and Political Weekly, Vol. 55, 2020.

**6.** जोशी, स.क., बाबा आमटे आणि सामाजिक पुनर्वसन, वर्धा: महारोगी सेवा समिती,

**7.** डोईफोडे, ज्योती. भारतीय समाज संरचना व परिवर्तन. औरंगाबाद विद्या बुक्स

**8.** महाजन वंदना,’ स्त्रीवाद आणि समाज परिवर्तन, ‘ अथर्व पब्लिकेशन, जळगाव .

**9.** देवी मंजू, अपेक्षित परिवर्तन मे महिलांओ की भूमिका .पुलिस अनुसंधान एव विकास ब्युरो गृह मंत्रालय नई दिल्ली.

**10.** सुगता मोहंती अनुवाद : वैशाली पेंढारकर जोशी, ‘विकासाच्या प्रक्रियेतील स्त्री-प्रश्न’ स्त्री अभ्यास केंद्र समाजशास्त्र विभाग पुणे विद्यापीठ पुणे – ७ मार्च १९९९

**11.** तांबे श्रुती, ‘स्त्रीवाद’ स्त्री अभ्यास केंद्र समाजशास्त्र विभाग पुणे विद्यापीठ पुणे –१९९९

**12.** डॉ. भागवत विद्युत, जोशी ललिता, ‘स्त्रियांच्या कर्तेपणाचा इतिहास एकोणिसावे शतक’ स्त्री अभ्यास केंद्र समाजशास्त्र विभाग पुणे विद्यापीठ मार्च १९९६.